**मनोज प्रभाकर कुळकर्णी** हे गेली ५ वर्षे हॉगकॉग महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष असून ते "गर्जे मराठी" या संस्थेच्या स्ट्रॅटेजिक समितीचे सदस्य आहेत. त्यांनी गेल्या वर्षी भारताच्या पूर्वेकडील देशांतील महाराष्ट्र मंडळांचा एक गट - "पूर्वबंध" स्थापन केला आहे.

ते सध्या "जॉन्सन इलेक्ट्रिक" या हाँगकाँग मधील बहुराष्ट्रीय कंपनीत "कॉर्पोरेट सप्लाय चेन"चे प्रमुख म्हणून काम करीत आहेत. जॉन्सन इलेक्ट्रिक कंपनी मायक्रो मोटर्स बनवणाऱ्या कंपन्यांत अग्रेसर असून, जगभर वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या कंपनीच्या 36 कारखान्यांत अशा मोटर्सचे उत्पादन केले जाते. कंपनीचा वार्षिक विक्री महसूल अंदाजे ३.५ अब्ज डॉलर्स (२५,००० कोटी रुपये) आहे आणि श्री. मनोज हे अंदाजे १०,००० कोटी रुपयांच्या, मोटारींना लागणाऱ्या कच्च्या मालाची आणि सुट्या भागांची खरेदी करतात.

ते सप्लाय चेन मॅनेजमेंट -पुरवठा साखळी व्यवस्थापनातील तज्ञ असून त्यांना जागतिक तसेच स्थानिक पातळीवर अभियांत्रिकी उद्योगात पुरवठा साखळी स्थापित करण्याचा तीस हून अधिक वर्षांचा समृद्ध अनुभव आहे. गेल्या तीस वर्षात त्यांनी महिंद्रा आणि महिंद्रा, फोर्ड मोटर्स, इमर्सन इलेक्ट्रिक, रोझमाऊंट मेजरमेंट, जॉनसन इलेकट्रीक अशा विविध भारतीय, अमेरिकन, युरोपियन आणि आशियाई कंपन्यांमध्ये विविध पदांवर काम केले आहे. त्यांनी जगभरातील 800 हून अधिक अभियांत्रिकी कंपन्यांना भेट दिली असून, कित्येक कंपन्यांचे सविस्तर ऑडिट केले आहे.त्यामुळे त्यांच्याजवळ विविध देशांतील वेगवेगळ्या व्यवसाय संस्कृतीत काम करण्याचा अनुभव आहे.

गेली काही वर्षे त्यांनी आशिया पॅसिफिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे. या वेगाने विकसित होणाऱ्या भौगोलिक क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी ते गेली दहा वर्षे चीनमध्ये राहत आहेत. सुरवातीला काही वर्षे शांघाय आणि आता हॉन्गकॉन्गमध्ये राहून ते आशियाई व्यवस्थापनांसाठी काम करत असल्यामुळे आशियाई व्यवसाय संस्कृती आणि प्रणालींबद्दल त्यांना सखोल माहिती असून तो त्यांचा खास अभ्यासाचा विषय आहे.

प्राथमिक शाळेपासून अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मनोज कुळकर्णींना दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती. मिळाली असून त्यांनी के.जे.सोमय्या कॉलेज मधून उत्पादन अभियांत्रिकीमध्ये आणि स.प.जैन मॅनेजमेंट संस्थेतून व्यवस्थापन शास्त्रात पदवी घेतली आहे. सध्या ते हॉन्गकॉन्ग मध्ये सप्लाय चेन मॅनेजमेंट मध्ये संशोधन करत असून लवकरच त्यांचा प्रबंध सादर करणार आहेत.

ते जरी विज्ञान शाखेचे विद्यार्थी असले तरीही त्यांना लहानपणापासूनच मराठी भाषेची आणि सामाजिक कार्याची आवड आहे. त्यांनी वीस वर्षांपूर्वी मुंबईत दहिसर येथे मराठी मंडळ स्थापन केले होते. शांघायमध्ये वास्तव्यात असताना त्यांनी शांघाय मराठी मंडळाचे अध्यक्षपद सांभाळले होते. ते नवनवीन कल्पनांवर आधारित रंगमंचीय कार्य्रक्रम सादर करून स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न करत असतात.

त्यांनी श्री. रत्नाकर मतकरी, श्री. दिलीप प्रभावळकर , श्री. शिरीष काणेकर यांची पुस्तके संपादित केली असून लहान मुलांसाठी काही पुस्तके लिहिली आहेत.

श्री. मनोज यांचे बालपण गेले मुंबईतील गोरेगाव उपनगरातील एका चाळीत. आई महानगरपालिका शाळेत शिक्षिका आणि वडील पश्चिम रेल्वेमध्ये साधे कर्मचारी. मुंबईच्या मराठी  मध्यमवर्गीय वातावरणात वाढलेल्या आणि मराठी माध्यमात शिकलेल्या श्री. मनोज यांनी इतकी प्रगती केली याचे श्रेय ते आईबाबांच्या संस्कारांना, त्यांनी मनावर बिंबवलेल्या साधेपणा, मेहनत आणि प्रामाणिकपणा यांच्या महत्वाला देतात.